**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे






वर्ष ५ । अंक २४६ । सोमवार २९ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


# खाऊसाहेब वाकचौरेला दिसेल तिथे तुडवा

## उद्धव ठाकरेंचा शिर्डीत घणाघात



**प्रशांत आग्रवाल**
**दैनिक आकर्षण**
**उपसंपादक, शिर्डी**

**शिर्डी –** शिवसेनेच्या सहा खासदारांच्या फुटी नंतर शिवसेना एक्शन मोडवर आली असून ज्या ज्या मतदारसंघात शिवसेनेचे खासदार बंडखोरी करत पक्ष सोडून गेले त्या मतदारसंघामध्ये स्वतः पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी जंगी सभा घेत पक्षाला सोडून गेलेल्या खासदारांवर गद्दार म्हणत सडकून टीका केली असून आज शिर्डीत देखील सिद्ध संकल्प लॉन्स येथे हजारो शिवसैनिकांच्या उपस्थितीत खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्यावर जोरदार हल्ला चढवत भव्य सभा संपन्न झाली पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी सकाळी श्री साईबाबांच्या मंदिरात दर्शन घेत त्यानंतर पत्रकार परिषद घेतली व त्यानंतर झालेल्या भव्य मेळाव्यात खासदार वाकचौरे यांचा खाऊसाहेब वाकचौरे असा उल्लेख करत टीकास्त्र डागले तसेच दिसेल तिथे तुडवा असा आदेश देखील





शिवसैनिकांना यावेळी उद्धव ठाकरेंनी दिला असून जो श्री साईबाबांची शप्पत घेऊन गद्दारी करू शकतो तो तो तुमचा आमचा काय होणार असे म्हणत शिर्डी मतदार संघातील जनता त्याला त्याची जागा दाखविल्या शिवाय राहणार नाही असे उद्धव ठाकरेंनी म्हटले सोबत आ आदित्य ठाकरे,खासदार संजय राऊत,अनिल देसाई ,अरविंद सावंत यांसह नेतेमंडळी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते उद्धव ठाकरे यांचे आगमन होताच जोरदार घोषणाबाजी करत शिवसैनिकांनी परिसर दणाणून सोडला.

# दिल्लीगेट येथील रस्ता दुभाजकामुळे एकाच वेळी चार अपघात

## उपमहापौर धनंजय जाधव यांच्याकडून तात्काळ उपाययोजना







**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिल्लीगेट येथून कल्याणरोड कडे जाणाऱ्या चौकातील रस्ता दुभाजकामुळे रविवारी रात्रीच्या सुमारास काही वेळातच चार वाहनांचे अपघात झाले.

अपघाताच्या घटनेची माहिती मिळताच उपमहापौर धनंजय जाधव यांनी घटनास्थळी भेट देऊन अपघातग्रस्त वाहनांना मदत कार्य केले. या अपघातग्रस्त भागावर उपाययोजना म्हणून उपमहापौर धनंजय जाधव यांनी सोमवारी सकाळीच पुन्हा घटनास्थळी भेट देऊन महानगरपालिकेचे अभियंता निंबाळकर तसेच संबंधित कर्मचारी यांना तात्काळ बोलावून घेत रस्ता दुभाजकावर रेडियम पट्टे तसेच लाईटची व्यवस्था करण्याचे आदेश दिले.

यावेळी दिल्लीगेट येथील व्यापारी विशाल येंडे, बाळासाहेब सांगोळे, ■ पान ४ वर

### दुभाजकच काढून टाकण्यात यावा, रस्त्यावर स्पीड ब्रेकर आणि लाईटची व्यवस्था करावी; दिल्लीगेटच्या व्यापाऱ्यांसह नागरिकांची मागणी

दिल्ली गेट वेसी पासून नेप्ती नाका रस्त्यावर असलेले रस्ता दुभाजक काढून टाकण्यात यावेत तसेच या रस्त्यावर स्पीड ब्रेकर आणि लाईटची पुरेशी व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी दिल्लीगेट परिसरातील व्यापारी आणि नागरिकांनी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव आणि महानगरपालिकेचे अभियंता निंबाळकर यांच्याकडे केली आहे. दिल्लीगेट वेस ते घोरपडे हॉस्पिटल पर्यंत रस्ता दुभाजक टाकण्यात आले होते. अनेक वाहनांचे अपघात झाल्यानंतर यातील अर्धा दुभाजक महानगरपालिकेच्या माध्यमातून काढून टाकण्यात आलेला आहे. मात्र उर्वरित दुभाजकामुळे पुन्हा अपघात घडू लागले आहेत. दररोज होणारे अपघातामुळे हा दुभाजक काढूनच टाकावा अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# संदेशनगरला साई मंदिरात वटपौर्णिमा उत्साहात साजरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वसंत टेकडी येथील संदेश नगर मधील द्वारकामाई साई मंदिरात वटपौर्णिमा मोठ्या उत्साहात, भक्ती भाव वातावरणात साजरी झाली. सावेडी उपनगरात प्रभाग क्रमांक दोन मधील संदेश नगर येथील साई मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान आहे.

दर महिन्याच्या शेवटच्या गुरुवारी महाआरती, महाप्रसादाचा ■ पान ४ वर



# विसापूरात गांजा विक्रीवर बेलवंडी पोलिसांचा छापा

## ७८० ग्रॅम गांजा जप्त, एक अटकेत तर मुख्य आरोपी फरार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी –** विसापूर येथे अवैधरित्या गांजा विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर बेलवंडी पोलीस ठाण्याच्या पथकाने छापा टाकून ७८० ग्रॅम गांजा जप्त केला. या कारवाईत एका आरोपीला अटक करण्यात आली असून मुख्य आरोपी पोलिसांना चकवा देत फरार झाला आहे. फरार आरोपीचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवार (दि. २८ जून २०२६) रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक () नंदकुमार सोनवलकर यांना गोपनीय माहिती मिळाली की, विसापूर येथील अमीन शफी शेख हा आपल्या भाई-भाई चिकन सेंटर येथे अवैधरित्या गांजा विक्री करत आहे. या माहितीची खातरजमा करून बेलवंडी पोलिसांनी तत्काळ पथकासह संबंधित ठिकाणी छापा टाकला.




छाप्यामध्ये भाई-भाई चिकन सेंटर येथे गुंजीलाल कान्हा मेहता (वय २४, रा. शेंदवा, ता. शेंदवा, जि. बडवानी, मध्य प्रदेश) हा गांजा विक्री करताना आढळून आला. त्याच्या ताब्यातून पोलिसांनी सुमारे ७८० ग्रॅम गांजा जप्त केला. ■ पान ४ वर




अहिल्यानगर अन्न औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे यांचा धसका घेत नगर शहरातील पान टपरीधारकानीं मावा गुटखा मिळणार नाही चे सुचना फलक लावण्यात आल्याने एकच चर्चेचा विषय होत आहे. (छाया– जाकीर शेख)

# आजचे बालक हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य - आमदार संग्राम जगताप

## । राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेनिमित्त टिळक रोड येथील पटेल मंगल कार्यालयात आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते बालकांना पोलिओ डोस



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेनिमित्त अहिल्यानगर शहरात विविध ठिकाणी शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना पल्स पोलिओचे दोन थेंब देण्याची मोहीम उत्साहात राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत टिळक रोड येथील पटेल मंगल कार्यालयात आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते बालकाला पल्स पोलिओचा डोस पाजून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, भारताने पोलिओमुक्त देशाचा मान मिळविला असला, तरी ही स्थिती कायम राखण्यासाठी प्रत्येक पात्र बालकाला पल्स पोलिओचा डोस देणे अत्यंत आवश्यक आहे. बालकांचे आरोग्य जपणे ही केवळ शासनाची नव्हे, तर समाजातील प्रत्येक पालक आणि नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक पालकाने आपल्या शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकाला पल्स पोलिओचे दोन थेंब अवश्य पाजावेत. या दोन थेंबांमुळे बालकाचे आरोग्य सुदृढ, निरोगी आणि सुरक्षित राहण्यास मोठी मदत होते.

ते पुढे म्हणाले की, आजचे बालक हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य असून त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. पोलिओसारख्या गंभीर आजारापासून प्रत्येक बालकाचे संरक्षण करण्यासाठी सर्व पालकांनी पुढाकार घेऊन राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी उपस्थित पालकांनीही आपल्या बालकांना पोलिओचा डोस देत राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेत सक्रिय सहभाग ■ पान ४ वर

# नगर शहरातील कत्तलखान्यावर एलसीबीचा छापा; तिघे गजाआड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील एका अवैध कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करत तीन आरोपींना रंगेहाथ अटक केली आहे, तर एक आरोपी फरार झाला आहे. या कारवाईत गोमांसासह एकूण ७६ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शहरात पेट्रोलिंग करत असताना मिसगर लायब्ररीसमोरील फकीर गल्लीच्या बोळीत एका पत्र्याच्या शेडमध्ये गोवंशीय जनावरांची अवैध कत्तल केली जात असल्याची खात्रीशीर माहिती गुप्त बातमीदारामार्फत मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने तात्काळ सदर ठिकाणी छापा टाकला. यावेळी गोवंशाची कत्तल करताना मुनावर फकीर सय्यद (वय ४०), नविद रफिक कुरेशी (वय ३०) आणि सालीम फय्याज अहमद कुरेशी (वय ३३, तिघे ■ पान ४ वर

# पढेगाव खून प्रकरणातील आरोपी एमआयडीसी पोलिसांकडून जेरबंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रीरामपूर तालुक्यातील पढेगाव येथे पैशांच्या देवाणघेवाणीवरून झालेल्या एका तरुणाच्या खून प्रकरणातील फरार आरोपीला एमआयडीसी पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. विशाल प्रदीप तोरणे (वय ४०, रा. पढेगाव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

दिनांक २७ जून रोजी सायंकाळी पढेगाव येथे पैशांच्या वादातून आरोपी विशाल तोरणे याने सचिन सुभाष बनकर (वय ४०) यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली होती. या गंभीर मारहाणीमुळे सचिन यांच्या पोटात अंतर्गत रक्तस्राव होऊन त्यांचा मृत्यू झाला.



याप्रकरणी मयताचे काका शशिकांत जगन्नाथ बनकरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात बीएनएस कलम १०३ (१), ११५(२), ११७ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. ■ पान ४ वर

# टीईटी-नीट पेपरफुटीप्रकरणी युवक काँग्रेसचे आंदोलन; केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** टीईटी व नीट परीक्षांच्या कथित पेपरफुटी प्रकरणामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले असून केंद्र सरकारच्या निष्काळजीपणाविरोधात आज अहिल्यानगर जिल्हा युवक काँग्रेस (ग्रामीण)च्या वतीने लाल टाकी परिसरात तीव्र आंदोलन करण्यात आले.

यावेळी कार्यकर्त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त केला. तसेच जोरदार घोषणाबाजी करत शिक्षण व्यवस्थेतील गैरप्रकारांवर संताप व्यक्त केला आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, आणि सारख्या महत्त्वाच्या परीक्षांमधील पेपरफुटीच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य अंधारात जात आहे. या घटनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्याचे वातावरण निर्माण झाले असून शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासही डळमळीत झाला आहे. त्यामुळे दोषींवर कठोर कारवाई करून परीक्षा प्रक्रिया पारदर्शक करण्याची मागणी करण्यात आली.

या आंदोलनावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस तथा उत्तर महाराष्ट्राचे सहप्रभारी राहुल उगले, अजय डिडोरे पाटील, प्रशांत जाधव, सोमनाथ पाबळे, तालुकाध्यक्ष योगेश शिंदे, तालुकाध्यक्ष डॉ. प्रकाश शेलार, महेंद्र सोलाट, राजू क्षेत्रे, किशोर पाबळे यांच्यासह युवक काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## दै. आकर्षण निवडक

### प्रा. रागिनी कदम-टेकाळे यांना हिंदी विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान



अहिल्यानगर- देवळाली प्रवरा येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या राजर्षी शाहू महाविद्यालयात हिंदी विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या रागिनी कदम-टेकाळे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडून हिंदी विषयातील ''इक्कीसवीं सदी के हिंदी उपन्यास : संवेदना के विविध आयाम'' या विषयावर पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी हे संशोधनकार्य न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील संशोधन केंद्रातून पूर्ण केले. हे संशोधन कार्य प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ येथील सहयोगी प्राध्यापक व हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. भाऊसाहेब नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. संशोधन प्रक्रियेदरम्यान संशोधन केंद्रप्रमुख डॉ. हनुमंत जगताप, डॉ. अशोक गायकवाड, डॉ. सुनीता मोटे तसेच राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्वाती हापसे आणि महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष मा. रामचंद्र दरे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, श्री. मनोज कदम, महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच देवळाली प्रवरा शहर परिसरातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### अभिषेक देवचके यांची सीए फायनल परीक्षेत घवघवीत यशस्वी कामगिरी



अहिल्यानगर - मे २०२६ मध्ये झालेल्या चार्टर्ड अकाउंटंट (सीए) फायनल परीक्षेत श्री. अभिषेक प्रशांत देवचके यांनी उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या कुटुंबासह अहिल्यानगरच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव वाढविला आहे. अभिषेक यांचे प्राथमिक शिक्षण सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूल, अहिल्यानगर येथे झाले. त्यानंतर त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण अहमदनगर कॉलेज, अहिल्यानगर येथे पूर्ण केले. शिक्षणादरम्यान त्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर सीए होण्याचे स्वप्न साकार केले. सीए अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने त्यांनी पुणे येथील नामांकित या संस्थेमध्ये आर्टिकलशिप पूर्ण केली. तसेच येथेही व्यावसायिक प्रशिक्षण घेत वित्तीय व लेखापरीक्षण क्षेत्रातील अनुभव संपादन केला. या अनुभवाचा त्यांना सीए फायनल परीक्षेत मोठा लाभ झाला.अभिषेक हे प्रशांत देवचके व प्रणिता देवचके यांचे सुपुत्र असून अमेय देवचके यांचे बंधू आहेत. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक, शिक्षक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुतळ्यासाठी केडगाव येथे बैठकीचे आयोजन

अहिल्यानगर - शहरातील ऐतिहासिक अप्पू हत्ती चौकात उभारलेल्या अश्वावर आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याची मागणी सकल मातंग समाजाच्या वतीने करण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवर सकल मातंग समाज केडगावच्या वतीने शिवाजी मंगल कार्यालय अंबिकानगर येथे मातंग समाजाच्या बैठकिचे रविवार दि. २८ जून रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयोजन करण्यात आले आहे. केडगाव सकल मातंग समाजाचे समन्वयक प्रा. विशाल पाचारणे यांनी मातंग समाजबांधवांनी मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. सदर मेळाव्यास प्रभाग क्र. १५,१६,१७ च्या नगरसेवकांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे अध्यक्ष संतोष साळवे यांनी सांगितले. ॲड. प्रदीप सकट, राजू बोरगे, महेश लोखंडे, विष्णू लोखंडे, साठे साहेब, संतोष उमाप, राजू डाडर, अक्षय बोरगे, गोरख लोखंडे आदी पदाधिकारी या बैठकीचे नियोजन व व्यवस्थापन पाहत आहे. समाजातील लोकांनी अधिक माहितीसाठी ८२०८९५४९२५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्याचे प्रसिद्धी प्रमुख धनंजय पाचारणे यांनी म्हंटले आहे.

# हृदयरोगी रूग्णांना मिळाला दिलासा : हेल्दी हार्ट राजयोगा शिबीर उत्साहात




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** येथील आनंदऋषीजी मेडिटेशन सेंटरच्या सभागृहात खास हृदयरोगी रूग्णांसाठी हेल्दी हार्ट राजयोगा शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराचा लाभ घेतलेल्या रूग्णांनी समाधान व्यक्त करीत दिलासा मिळाल्याच्या भावना व्यक्त केल्या. या शिबीरात हृदयरोगी रूग्णांसहित नर्सिंग कॉलेजच्या जेष्ठ विद्यार्थीनींनीही लाभ घेतला अशी माहिती आनंदऋषीजी हॉस्पिटलचे व्यवस्थापक डॉ. आशिष भंडारी यांनी दिली.

तीन दिवसीय संपन्न झालेल्या या शिबीराचे उद्घाटन डॉ. प्रकाश कांकरिया यांच्या हस्ते झाले. सदर प्रसंगी हृदयरोगतज्ज्ञ डॉ. राहुल अग्रवाल डॉ. अमित भराडीया, डॉ. अनिकेत कटारीय, राजयोगा मेडिटेशनच्या अभ्यासक डॉ. सुधा कांकरिया, ब्रह्माकुमारी राजराजेश्वरी दिदी, बी के प्रभा दिदी, रोटरीचे अध्यक्ष सुभाष गर्जे उपस्थित होते. सदर शिबीराचे आयोजन आनंदऋषीजी हॉस्पिटलचे प्रिव्हेंटिव्ह कार्डिओलॉजी डिपार्टमेंट, ब्रह्माकुमीजचे साईबन में मधुबन गीतापाठशाला व रोटरी क्लब ऑफ अ.नगर ने केले होते.

सदर शिबीरात हृदयाची रचना, कार्य, हृदयाचे आजार व उपचार तसेच हार्ट अटॅक, एन्जीओप्लास्टी, बायपास या विषयी हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अनिकेत कटारिया, डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अमित भराडिया यांनी मार्गदर्शन केले. डॉक्टरांनी दिलेले उपचार मेडिसीन घेण्यासोबतच मेडिटेशन पण करणे हे महत्वाचे आहे हे अधोरेखित केले. तसेच हृदयरोग होण्याच्या कारणात ६०% पेक्षा जास्त भाग हा मानसिक प्रदुषण असुन खाण्यापिण्यातील अनियमितता, चुका, व्यायामाचा अभाव, तसेच अनिद्रा यांचाही सामावेश आहे. मानसिक शांतता, प्रसन्नता लाभण्यासाठी तसेच मानसिक बळ लाभण्यासाठी आणि ताणतणावा पासुन दूर राहण्यासाठी राजयोगा मेडिटेशन जीवनपध्दती अंगिकारणे महत्वाचे आहे असे प्रतिपादन राजयोगा मेडिटेशनच्या अभ्यासक डॉ. सुधा कांकरिया यांनी केले व राजयोगा मेडिटेशनची विधी व सिध्दी समजावुन सांगितली. बी के राजराजेश्वरी यांनी राजयोगा व्दारे झालेले संशोधनाची माहिती दिली. सदर प्रसंगी डॉ. सुधा कांकरिया लिखित 'हृदय आरोग्याच्या गप्पा गोष्टी' या पुस्तकाचे वितरण करण्यात आले. डॉ. प्रकाश कांकरिया म्हणाले की सध्या भारत हा हृदयरोगाची राजधानी ठरत असुन तरूण वयातही आता हृदयरोग बळावत चालला आहे. त्याचा वेळीच बंदोबस्त करणे आवश्यक आहे. उच्च रक्तदाब, मधुमेह, लठ्ठपणा, मांसाहारी भोजन, वाढलेले कोलेस्ट्रॉल यामुळे हृदयरोगाची संख्या वाढत चालली आहे. याचे ही नियंत्रण करण्यासाठी राजयोगा जीवनपध्दती उपयोगी ठरते.

# आज कासारे येथे वटसावित्री कार्यक्रम सोनियाईताई राजदेव यांच्या उपस्थितीत आनंदात साजरा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**कासारे–** आज कासारे गावात वटपौर्णिमेच्या मुहर्तावर वृक्षलागवड, शेतकऱ्यांसाठी बी बियाणे वाटप आणि वटसावित्री कार्यक्रम टाकळी ढोकेश्वर गटाच्या नेत्या सोनियाताई राजदेव यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. महिलांनी स्वावलंबी बनले पाहिजे, स्वतः साठी जगलं पाहिजे, त्याचबरोबर जुन्या काळाप्रमाणे चूल आणि मूल न पाहता सध्याच्या धावपळीच्या जगात महिलांना प्राधान्य मिळाले पाहिजे तरच महिला काहीतरी करू शकते असा निर्धार प्रत्येक महिलेने केला पाहिजे असे सोनियाताई राजदेव यांनी म्हटले आहे.

या कार्यक्रम प्रसंगी कासारे गावचे कार्यसम्राट सरपंच शिवाजीराव निमसे ,कार्यकारी सोसायटी चे चेअरमन तुळशीराम लगड , माजी मुख्याध्यापक पोपट नरड सर, बाळासाहेब नरड सर, मा.सरपंच शंकरराव घनवट ,बापू दातीर , कृषी अधिकारी नवले साहेब , शकुंतला नरड , ज्योती घनवट ,गौतमी साळवे , लता नरड ,रोहिणी निमसे , मुक्ता निमसे ,पूनम निमसे ,मीरा निमसे ,अनुसया नरड ,छाया नरड , सुवर्णा लगड , वैशाली लगड ,मीराबाई दातीर ,संगीता दातीर ,माधुरी नरड आदी महिला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नीलेश लंके प्रतिष्ठानचे तालुका उपाध्यक्ष होते. सूत्रसंचालन पोपट नरड सर यांनी केले तर आभार गोकुळ निमसे यांनी मानले.

### किर्लोस्करच्या वर्धापनदिनानिमित्त २५५ कामगारांचे रक्तदान

# निस्वार्थपणे केलेले रक्तदान हे पुण्यकर्मच- चैतन्य शिंदे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** किर्लोस्कर कंपनीच्या वतीने दरवर्षी वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात येते.कंपनीचे सर्व कामगार सामाजिक कार्यात सहभागी होत असतात. कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांच्या रक्तदान शिबिरातील उस्फूर्तपणे सहभागाने २५५ रक्तपिशव्यांचे संकलन झाले आहे. ही समाधानकारक बाब आहे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदानाने अनेकांचे प्राण वाचतात.निस्वार्थपणे केलेले रक्तदान हे पुण्यकर्मच आहे. असे प्रतिपादन प्लांट हेड चैतन्य शिंदे यांनी केले आहे. एमआयडीसी येथील किर्लोस्कर कंपनीचा वर्धापन दिन व उद्योजक कै.लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचा १५७ वा जन्मदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबिरात कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.या रक्तदान शिबिरात सामाजिक बांधिलकी जपून २५५ कामगारांनी रक्तदान केले.याप्रसंगी किर्लोस्कर कंपनीचे प्लांट हेड चैतन्य शिंदे,आयोजक अमोल तोरणे व सुनील हिरडे,मजदुर सेना नगर जिल्हा अध्यक्ष व शिवसेना नगर जिल्हा प्रमुख बाबूशेठ टायरवाले यांची विशेष उपस्थिती लाभली.

तसेच डिपार्टमेंट हेड राजेंद्र बोगम, प्रशांत शिंदे,अतुल भोसले, विकास जोशी, काशिनाथ कोकणे, मनिष ठिगळे, कैलास गुरव,अंबरीश फरक्या,नितीन बोडके, गौरव शर्मा, राहुल राजपूत,ज्ञानेश्वर काळे ,युनियन प्रतिनिधी वसंत सिंग, कचरू ढगे,राजेंद्र पाटील,संजय शिरसाठ,कानिफनाथ धाडगे आदींसह जनकल्याण रक्तकेंद्राचे डॉ.सुभदा देशपांडे,प्रशासकीय अधिकारी सागर उंडे,जनसंपर्क अधिकारी शरद बळे,प्रीती चिपाडे,विनिता धामणगावकर,तेजल हांडे,स्नेहल ब्राह्मणे,अनिता तरटे,सुलभा पवळ,गया चव्हाण,वेदांत हरिश्चंद्रे,अविनाश कदम आदी उपस्थित होते.

रक्तदानाच्या उत्कृष्ट कार्याबद्दल जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने किर्लोस्कर कंपनीचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन विशेष गौरव करण्यात आला.रक्त संकलनाचे कार्य जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने करण्यात आले.

# चितेगावात चक्री जुगार व अवैध दारूविक्रीवर पोलिसांचा धडक छापा; ३१ हजारांचा मुद्देमाल जप्त



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** पैठण तालुक्यातील बिडकीन, एमआयडीसी आणि पैठण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत चितेगाव येथे पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईत चक्री जुगार चालविणाऱ्यासह अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण ३१ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईदरम्यान पोहेकॉ विष्णू गायकवाड, कैलास राठोड तसेच बिडकीन पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार सूरज ढवळे व त्यांच्या पथकाने चितेगाव परिसरात छापा टाकून चक्री जुगार आणि अवैध दारूविक्री करणाऱ्यांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम व अन्य साहित्य असा एकूण ३१ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अवैध धंद्यांविरोधातील पोलिसांची ही कारवाई पुढेही सुरू राहणार असून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# बडीसाजन मंगल कार्यालय येथे २८,२९,३० जून रोजी तीन दिवसीय शिबिर

### 'समर्पण चातुर्मास'या पावन पर्वा मध्ये सहभागी होऊन भाविकांनी श्रद्धेने व समर्पण भावनेने गुरुंशी लीन व्हावे–तिर्थेश ऋषीजी म.सा.



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जगातील पशु,मनुष्य,देवता या सर्व जीवांना तीर्थ करायचे हा संकल्प महावीर स्वामींनी केला म्हणून त्यांना तीर्थंकर म्हणले जाते.मानवी भाषेत स्थापना करणाऱ्याला संस्थापक म्हणतात. परंतु महावीर स्वामींना तिर्थंकर म्हणले आहे.एकदा तीर्थ बनले तर ते जगासाठी पूजनीय होतात.तीर्थाच्या पाच अवस्था अनर्थ,व्यर्थ,सार्थ,अर्थ आणि तीर्थ या आहेत.जो व्यक्ती तीर्थ आहे तो अनर्थ आणि व्यर्थ यापासून मुक्ती मिळवतो. तीर्थापेक्षा मोठी उपमा आपल्या जीवनात नाही.महावीर स्वामींचा संदेश स्वीकार करावा. त्यावेळेस आपल्या जीवनाचे तीर्थ होईल.हाच संदेश घेऊन उपाध्याय प्रवीण ऋषीजी म.सा. अहिल्यानगर येथे आले आहे. ही धर्मा यात्रा राष्ट्रसंत आनंदऋषीजी म.सा.यांना समर्पित करावी.२००९ साली उपाध्याय प्रवीणऋषीजी म.सा. यांचा चातुर्मास झाला होता. तब्बल सोळा वर्षानंतर २९ जुलै २०२६ रोजी होणारा शिखर चातुर्मास हा ''समर्पण चातुर्मास''या नावाने होणार असल्याने सर्व आनंद भक्तांमध्ये मोठे उत्साहाचे वातावरण आहे.''समर्पण चातुर्मास''या पावन पर्वा मध्ये सहभागी होऊन भाविकांनी श्रद्धेने व समर्पण भावनेने गुरुंशी लीन व्हावे.असे निरुपण तिर्थेश ऋषीजी म.सा.यांनी केले आहे.

बडीसाजन मंगल कार्यालय येथे तीर्थेश ऋषीजी म.सा.यांनी धर्म प्रभावाना करताना समाजाचे प्रबोधन केले.याप्रसंगी चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष बाबुशेठ बोरा,विलास कटारिया, अभिजीत गांधी,विनोद कटारिया तसेच सपना कटारिया,मीना पितळे,योगिता चंगेडिया,स्वाती कटारिया,मिना पितळे,पुनम बोरा,दिप्ती मुथा आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तिर्थेश ऋषीजी म.सा.यांनी पुढे बोलताना सांगितले की,महावीर स्वामी यांच्या आगमनाने चंडकोषी नावाच्या सर्पाचे तीर्थ झाले.महावीर स्वामींचे दर्शन केल्याने चंडकोषी सर्पाचे तिर्थंकर गोत्र झाले.

''पहावा आनंद ऐकावा आनंद बोलावा आनंद श्वासा श्वासात,आनंदाचे डोही आनंद तरंग मायबाप माझे आनंद माऊली,हृदय आनंद जीवनी आनंद वाहावा आनंद श्वासा श्वासात''

या कवितेत सांगितले प्रमाणे गुरुकृपा होण्यासाठी गुरूंना पाहायचे आहे.बोलायचे आहे.समजायचे आहे.गुरूंना अनुभवायचे आहे.गुरूंच्या चरणी चंदन होऊन लीन व्हावे.अशी उपमा कवीने दिली आहे. चंदनाच्या झाडाचे वैशिष्ट्य म्हणजे चंदनाच्या झाडाला साप लपटलेले असतात.दोन्हीही विरुद्ध गुण असलेले आहेत. चंदन सापाला येण्यासाठी नकार देत नाही परंतु मी चांगलेच गुण घेऊ शकतो परंतु तुझे वाईट गुण घेणार नाही.चंदन थंडपणा देते.पण सापाचे विष घेत नाही. चंदना प्रमाणेच मानवाने जीवनात चांगल्या गोष्टींचा स्वीकार करावा.हा संदेश भगवंत महावीर स्वामींनी दिला आहे.

# मानवी हक्क अभियानच्या लढ्याला यश; २० दिवसांच्या संघर्षानंतर ८ जणांवर गुन्हा दाखल



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शेवगाव तालुक्यातील जुने दहिफळ येथील शेतकरी महिला सौ. हिराबाई लक्ष्मण भारस्कर यांना जागेच्या वादातून झालेल्या मारहाणीच्या प्रकरणात अखेर तब्बल २० दिवसांनंतर आठ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मानवी हक्क अभियानच्या वतीने करण्यात आलेले उपोषण, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि न्यायासाठी उभारलेला संघर्ष यामुळेच ही कारवाई शक्य झाल्याचा दावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

सोमवारी (दि. २२ जून) शेवगाव पोलीस ठाण्यात संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. यानंतर फिर्यादी महिला तसेच मानवी हक्क अभियानच्या पदाधिकाऱ्यांना गुन्हा दाखल झाल्याची प्रत अधिकृतरित्या देण्यात आली. या प्रकरणी मानवी हक्क अभियानचे जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत डोलारे, जिल्हा संघटक अशोकराव भोसले, जिल्हाध्यक्ष लखन साळवे, जिल्हा सचिव सहदेव चव्हाण आणि जिल्हा सल्लागार गोविंद सातपुते यांनी पुढाकार घेतला होता. पीडित महिलेला न्याय मिळावा आणि दोषींवर कारवाई व्हावी यासाठी शेवगाव तहसील कार्यालयासमोर कुटुंबीयांसह उपोषण करण्यात आले होते. तसेच स्थानिक पोलीस प्रशासन, वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता.

फिर्यादी सौ. हिराबाई भारस्कर या जुने दहिफळ येथील रहिवासी असून त्यांचे कुटुंब शेती व्यवसायावर उदरनिर्वाह करते. गट क्रमांक ३९ मधील ४० गुंठे जमीन ही त्यांच्या सासऱ्यांच्या नावावर होती.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### योग विद्याधामतर्फे १ जुलैपासून विविध योग वर्गांना प्रारंभ

अहिल्यानगर- शहरातील योग विद्याधामतर्फे येत्या १ जुलैपासून नागरिकांसाठी विविध योग प्रशिक्षण वर्गांना सुरुवात करण्यात येणार आहे. यामध्ये प्राथमिक योगासन वर्ग, योग परिचय वर्ग आणि प्राणायाम वर्ग यांचा समावेश असून सर्व वयोगटातील नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन योग विद्याधामचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी केले आहे. हे सर्व वर्ग योग भवन, ज्ञानेश्वर ड्रायव्हिंग स्कूल मागे, कुष्ठधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर येथे नियमितपणे आयोजित करण्यात येणार आहेत. प्रशिक्षित मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली योगाभ्यासाचे प्रशिक्षण दिले जाणार असून शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी हे वर्ग उपयुक्त ठरणार आहेत. योगाभ्यासामुळे निरोगी जीवनशैली अंगीकारण्यास मदत होत असल्याने नागरिकांनी या वर्गांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन वर्गप्रमुख अनिरुद्ध भागवत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ०२४१-२४२१२५५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

### वासन टोयोटा शोरूमला आमदार विक्रमसिंह पाचपुते यांची भेट



अहिल्यानगर- वासन टोयोटाच्या श्रीगोंदा येथील शोरूमला आमदार विक्रमसिंह पाचपुते व माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी श्रीगोंदा नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष सुनीताताई खेतमाळीस तसेच नगरसेवकांसह सदिच्छा भेट दिली. यावेळी शोरूमचे जनक आहुजा आणि अनिश आहुजा यांनी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत त्यांचा सत्कार केला. यावेळी नगरसेवक राजेंद्र खेडकर, पल्लवी पांडुरंग पोटे, मच्छिंद्र दत्तात्रय शिंदे, सुशील कुमार गुलाबराव, चांदणी दिलीप खेतमाळीस, वंदनाताई संग्राम घोडके, सुनीता अनिल घोडके, सोनाली सागर गोरे, अलका सुनील अनभुले, मनीषा विठ्ठल आनंदकर, शहाजी तुकाराम खेतमाळीस, प्रशांत मिठू गोरे यांच्यासह, राजूशेठ उखांडे, प्रशांत दरेकर, विकास बोरुडे, हरीश ढवण, राहुल पुरी, ज्ञानदेव खेतमाळीस, धनंजय कोथांबीरे, शोरुमचे सुशील ढवण, सौरभ श्रोत्री, अविनाश अडोळकर, प्रविण जोशी, खेतमाळीस आदी मान्यवर उपस्थित होते. शोरूमचे जनक आहुजा आणि अनिश आहुजा यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानत ग्राहकांना उत्कृष्ट सेवा आणि जागतिक दर्जाचा वाहन खरेदीचा अनुभव देण्यासाठी वासन टोयोटा कटिबद्ध असल्याचे सांगितले.

### आरक्षणाच्या उपवर्गीकरणासाठी जनजागृती करणारे कैलास खंदारे यांच्यावर भ्याड हल्ला

अहिल्यानगर - अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी राज्यभर जनजागृती करणारे लहुजी शक्ती सेना महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा अहिल्यानगर शहरातील मातंग समाजाच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून आरोपींना तातडीने अटक करावी, हल्ल्यामागील सूत्रधारांचा शोध घ्यावा तसेच कैलास खंदारे यांना शासकीय पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठविलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.या निवेदनावर सुनिल शिंदे, जयवंत गायकवाड, लक्ष्मण नीक्षे, ज्ञानेश्वर जगधने, प्रवीण वैरागर, सिताराम शिरसाठ, किरण कंगरे, लखन साळवे, संतोष उमाप, राजाराम काळे, उत्तम रोकडे, नवनाथ शिंदे, अभी मिसाळ, विशाल साळवे आणि तेजस अवचर यांच्यासह मातंग समाजातील विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### मैनाबाई श्रीमल गुंदेचा यांचे निधन



अहिल्यानगर- येथील श्रीमलजी रूपचंद गुंदेचा (साईनाथ दलाल) यांच्या धर्मपत्नी मैनाबाई श्रीमल गुंदेचा यांचे रविवार दि. २८ जून २०२६ रोजी सकाळी अल्प आजाराने निधन झाले. त्या ७९ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, मुले मनोज, महेश गुंदेचा, मुलगी उज्वला, सुना, जावई ,नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या अतिशय धार्मिक व मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या. त्यांच्यावर रविवारी दुपारी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

---

मुळा कारखान्यावर माजी मंत्री शंकरराव गडाखांच्या सहकार

# पॅनलची पुन्हा एकहाती सत्ता; विरोधी उमेदवारांचा ६ हजार मतांनी दारुण पराभव

**निकालांनंतर नवनिर्वाचित संचालकांनी घेतली शंकरराव गडाखांची भेट; नेवासा तालुक्यात गडाखांचेच वर्चस्व पुन्हा सिद्ध!**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**नेवासा–** मुळा सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत माजी मंत्री आमदार शंकरराव गडाख यांच्या सहकार पॅनलने पुन्हा एकदा आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध करत कारखान्यावर एकहाती सत्ता कायम राखली आहे. उमेदवारी अर्ज माघारीच्या वेळी २१ पैकी १७ जागा बिनविरोध जिंकून गडाख पॅनलने आधीच विजयाचा पाया रचला होता. उर्वरित चार जागांवरही रविवारी सुमारे ६ हजार मतांच्या विक्रमी आघाडीने विजय मिळवत विरोधी पॅनलचा दारुण पराभव केला.

या दणदणीत विजयानंतर कारखान्याचे नवनिर्वाचित संचालक, ज्येष्ठ नेते आणि हजारो कार्यकर्त्यांनी माजी मंत्री शंकरराव गडाख यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले व त्यांचे जंगी स्वागत केले. या ऐतिहासिक विजयामुळे संपूर्ण नेवासा तालुक्यात शंकरराव गडाख यांचेच एकमुखी वर्चस्व असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

विरोधकांना उमेदवारही मिळेनात; चारही जागांवर गडाख पॅनलचा धुव्वा! निवडणूक जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियावर सर्व जागांवर लढत देण्याचा दावा करणाऱ्या विरोधी पॅनलला प्रत्यक्षात सर्व जागांसाठी उमेदवारही उभे करता आले नाहीत. त्यामुळे ही निवडणूक केवळ चार जागांसाठीच मर्यादित राहिली. या चारही जागांवर मतदारांनी गडाख पॅनलवर एकतर्फी विश्वास दाखवत विरोधकांना पूर्णपणे नाकारले.

करजगाव गट:या गटातून गडाख पॅनलचे चंद्रकांत भानुदास टेमक (६,८९५ मते) आणि ज्ञानेश्वर रामराव दरंदले (६,७२५ मते) यांनी दणदणीत विजय मिळविला. विरोधी उमेदवार नारायण डौले (८४७) व किरण जाधव (१,०४१) यांना पराभवाचा सामना करावा लागला. महिला राखीव मतदारसंघ: गडाख पॅनलच्या कमल चांगदेव दहिफळे (७,४०१ मते) आणि विमल नारायण सोनवणे (७,१८२ मते) प्रचंड बहुमताने विजयी झाल्या. तर विरोधी उमेदवार मीराबाई दिवटे यांना केवळ १,००० मते मिळाली. यापूर्वीच सोनई, घोडेगाव, खरवंडी, नेवासा, प्रवरासंगम तसेच विविध प्रवर्गांतील एकूण १७ उमेदवार बिनविरोध निवडून आले होते.

**धनशक्तीला मतदारांचे चोख उत्तर: गडाख पॅनल** विजयानंतर कार्यकर्त्यांनी आणि विजयी उमेदवारांनी शंकरराव गडाख यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली आणि पुष्पहार अर्पण करून आशीर्वाद घेतले. या वेळी गडाख यांच्या नेतृत्वाचा जयघोष करत कार्यकर्त्यांनी जोरदार जल्लोष केला. ''हा विजय म्हणजे माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या पारदर्शक आणि शेतकरीभिमुख नेतृत्वावर सभासदांनी टाकलेला अढळ विश्वास आहे. विरोधी पॅनलकडून धनशक्तीच्या बळावर मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न झाला, मात्र सुज्ञ सभासद मतदारांनी मतदानातून त्याला चोख उत्तर दिले आहे,'' अशी भावना विजयी उमेदवारांनी या वेळी व्यक्त केली.

**विरोधी मतांमध्ये लक्षणीय घट; खाजगी कारखानदारांना मतदारांनी नाकारले!** गेल्या दहा वर्षांपूर्वी झालेल्या कारखाना निवडणुकीत गडाख विरोधी पॅनलला पडलेल्या मतांच्या तुलनेत, या निवडणुकीत विरोधी पॅनलच्या उमेदवारांना मिळालेल्या मतांमध्ये लक्षणीय घट झाली आहे. खासगी कारखानादार असलेल्या विरोधी पॅनल प्रमुखाला कारखान्याच्या सभासद मतदारांनी पूर्णपणे नाकारले असून, तालुक्याची सहकार चळवळ ही गडाखांच्याच हाती सुरक्षित असल्याचा संदेश या निकालातून दिला आहे.

---

# ... तर उपमुख्यमंत्र्यांसह पालकमंत्र्यांच्या कार्यालयावर धडक मोर्चा - ॲड. काकडे

**'सुधारित ताजनापूर टप्पा-१'च्या पूर्णत्वासाठी बैठक संपन्न, कृती समितीची पुनर्रचना; पाण्यासाठीची लढाई तीव्र करण्याचा शेतकऱ्यांचा निर्धार**



(छाया : बाबा पालवे)

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शेवगाव–** ''ताजनापूर योजनेचा प्रश्न आता निर्णायक वळणावर आला आहे. सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींच्या पळकुटेपणाने लाभार्थी गावातील शेतकऱ्यांचा संयमच पाहिला असून, आपण मुर्दाडसारखे पडून राहणे योग्य नाही. इतर जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधी पाणी पळवून नेण्याच्या प्रयत्नांत असताना, धरण उशाला असूनही आपण मात्र तहानलेले आहोत. तालुक्याच्या इतिहासातील ''कोपरे धरणाचे पाणी लाडजळगाव पर्यंत आणू'' ही एक निव्वळ वल्गना ठरल्याने 'जसा या योजनेचा दहावा' घातला तशी वेळ 'ताजनापूर'वर येऊ नये यासाठी वेळीच जागे होऊन पाणी मिळेपर्यंत मागे हटायचे नाही, असा एल्गार ॲड. शिवाजीराव काकडे यांनी पुकारला आहे. शासन-प्रशासनाने हा प्रश्न तातडीने न सोडवल्यास थेट राज्याचे उपमुख्यमंत्री, जलसंपदामंत्री आणि पालकमंत्र्यांच्या कार्यालयावर जाहीर मोर्चा काढण्यात येईल,'' असा इशाराही त्यांनी दिला.

'सुधारित ताजनापूर टप्पा-१' या योजनेच्या पूर्णत्वासाठी शेवगाव येथील श्री संत गाडगे महाराज छात्रालयामध्ये रविवारी (दि. २८) लाभार्थी गावातील शेतकरी, युवक आणि महिलांची अत्यंत निर्णायक बैठक ॲड. काकडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी मा.जि.प.सदस्या सौ. हर्षदा काकडे, माणिक म्हस्के, जगन्नाथ गावडे, नवनाथ ढाकणे, लक्ष्मण गवळी, अर्जुन ढाकणे, मधुकर झिरपे, रामजी पोटफोडे, बंडूभाऊ म्हस्के, रामराव ढाकणे, संजय काकडे, प्रमोद तांबे, गोरक्ष भोसले, अरुण खर्चन, मच्छिंद्र भापकर, रंगनाथ ढाकणे, प्रा.दादासाहेब जवरे, विठ्ठल केदार, नारायण टेकाळे आदी उपस्थित होते.

या बैठकीत जुनी ताजनापूर कृती समिती बरखास्त करून नव्या कृती समितीची घोषणा करण्यात आली. समितीच्या निमंत्रकपदी लक्ष्मणराव गवळी यांची निवड करण्यात आली आहे. याशिवाय, योजनेत समाविष्ट असलेल्या प्रत्येक गावात महिला व युवकांसह स्वतंत्र ग्रामस्तरीय कृती समित्या स्थापन केल्या जाणार आहेत. या समित्यांच्या माध्यमातून पुढील आंदोलनाची दिशा ठरवून संघर्ष अधिक तीव्र केला जाणार आहे. शासनाचे आणि संबंधित विभागाचे लक्ष वेधण्यासाठी कृती समितीच्या माध्यमातून पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्यात आली असुन ''जर शासन आणि प्रशासनाने ताजनापूर योजनेचा प्रश्न तातडीने निकाली काढला नाही, तर थेट राज्याचे उप मुख्यमंत्री आणि जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री यांच्या कार्यालयावर जाहीर मोर्चा काढण्यात येईल,'' असा स्पष्ट मनोदय समितीचे अध्यक्ष ॲड.काकडे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

या बैठकीला कृती समितीचे नवनियुक्त पदाधिकारी,ज्येष्ठ मार्गदर्शक,संबधित गावागावातील शेतकरी,युवक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी जि.प सदस्या काकडे यांनी केले.सूत्रसंचालन भाऊसाहेब सातपुते यांनी केले. दरम्यान, 'ताजनापूर योजने'वरून शेवगाव तालुक्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

**नव निर्वाचित ताजनापूर कृती समिती**

**सखाहरी भापकर, भाऊसाहेब बोडखे, माणिक म्हस्के, गोरक्ष वावरे, ॲड.संजय काकडे, विठ्ठल केदार, विष्णू शिरसाठ, प्रा.दादासाहेब जवरे, सुधाकर धावणे, नवनाथ ढाकणे, संदीप झिरपे, वीर भाऊसाहेब, अन्साराम बोडखे तर निमंत्रक म्हणून लक्ष्मणराव गवळी यांचेसह नवीन कृती समिती स्थापन करण्यात आली आहे.**

**निवडणूक आली की ताजनापूर आठवते या आरोपामुळे आम्ही एकदीड वर्ष आम्ही शांत बसलो मात्र योजनेचे काम अपूर्णच राहिल्याने गावा-गावातील शेतकऱ्यांच्या आग्रही मागणीमुळे हा लढा पुन्हा शेतकऱ्यांच्या साथीने पूर्ण ताकदीने लढणार आहोत.**

**हर्षदा काकडे, माजी जि.प सदस्या.**

**दुष्काळी गावात जन्माला आलो, पण दुष्काळी म्हणून मरणार नाही!**

**बैठकीत विविध वक्त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, पाणी प्रश्न किती गंभीर आहे हे या मे-जून महिन्यात प्रकर्षाने जाणवले आहे. पाण्याअभावी शेतात उभ्या उसाची चिपाडे झाली आहेत. कै.आबासाहेबांनी सुरु केलेला हा लढा पुढील पिढ्यांच्या उज्वल भविष्यासाठी ताकदीने पुढे चालवला जाईल. दुष्काळी गावात जन्माला आलो, पण दुष्काळी म्हणून मरणार नाही!' अशी खुणगाठ बांधून १३ गावांना पाणी मिळेपर्यंत ॲड. काकडे यांच्या नेतृत्वाखाली सामूहिक प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी शेतकऱ्यांनी व्यक्त केला.**

---

# शिवसेनेच्या ६० व्या वर्धापनदिनानिमित्त वाडिया पार्क परिसरात वृक्षारोपण; नागरिकांनी स्वीकारली वृक्षसंवर्धनाची जबाबदारी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या समाजसेवेची प्रेरणा जपत शिवसेनेच्या ६० व्या वर्धापनदिनानिमित्त शिवसेना अहिल्यानगर शहराच्या वतीने व एकता फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २८ जून) जुनी महापालिकेजवळील वाडिया पार्क परिसरात वृक्षारोपणाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. विशेष म्हणजे, परिसरातील नागरिकांनी लावलेल्या वृक्षांच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारत हा उपक्रम केवळ वृक्षारोपणापुरता न ठेवता वृक्षसंवर्धनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले.

यावेळी बोलताना शिवसेना शहरप्रमुख संभाजी अशोकराव कदम म्हणाले, ''शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसैनिकांना समाजकारण, पर्यावरण संवर्धन आणि जनसेवेचे संस्कार दिले. धर्मवीर आनंद दिघे यांनी हे विचार कृतीतून जपले. त्याच परंपरेचा वारसा पुढे नेत शिवसेना समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबवत आहे. झाडे लावणे ही केवळ सुरुवात आहे; ती जगविणे ही



खरी जबाबदारी आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा.''

माजी महापौर तथा नगरसेविका सौ. सुरेखा संभाजी कदम म्हणाल्या, ''पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धन ही काळाची गरज आहे. वाढते प्रदूषण आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने वृक्षारोपणासोबत वृक्षांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. परिसरातील नागरिकांनी स्वतःहून वृक्षांच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारली, ही अत्यंत समाधानाची बाब असून अशा उपक्रमातून पर्यावरण संरक्षणाची जनचळवळ अधिक बळकट होईल.''

कार्यक्रमात उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणाची सामूहिक शपथ घेत लावलेल्या प्रत्येक वृक्षाचे नियमित संगोपन करण्याचा निर्धार व्यक्त केला. सामाजिक बांधिलकी जपत शिवसेनेने राबविलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बाबूशेठ टायरवाले, शहरप्रमुख संभाजी अशोकराव कदम, नगरसेविका तथा माजी महापौर सौ. सुरेखाताई संभाजी कदम, दत्तात्रय हरिभाऊ कावरे, बाळासाहेब बोराटे, मंगलताई सुनील लोखंडे, पवन गांधी, आदेश जाधव, शिवाजी कदम, घनश्याम घोलप, तडवी साहेब, नलिनीताई गायकवाड, नीता बर्वे, प्रवीण बेंद्रे, अजय लाखापती, योगेश चुत्तर, अमित बलदोटा, डॉ. सतीश कदम, सुप्रभात गुप्ता, डॉ. अमोल जाधव, डॉ. पवार, ॲड. महेश तवले, अजय पवार, आशुतोष कोकड, राहुल फुलसोदर, राहुल चव्हाण, जयंत भापकर, बाळासाहेब दळवी, दीपक पवार, दत्ता बनकर, शिवाजी जाधव, पवन गुंडेचा, बोगावत, समीर बोरा, सचिन डुंगरवाल, मोहनशेठ लुल्ला, सुब्बाराव सतलूर, प्रमोद बोखरिया, अजय मिसाळ, गोट्या धुमाने तसेच जैन ओसवाल संघ, सुप्रभात ग्रुप यांचे पदाधिकारी, शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# पाटेगावात पल्स पोलिओ अभियानाचा शुभारंभ; प्रत्येक बालकाला लस देण्याचे आवाहन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण अभियानांतर्गत पाटेगाव येथे रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. पैठण पंचायत समिती सदस्या सौ. डॉ. सखूताई भारत झारगड व डॉ. भारत झारगड यांच्या हस्ते पोलिओ लसीकरण मोहिमेला प्रारंभ झाला.



यावेळी अंगणवाडी सेविका सोनाली करकसे, अर्चना रावस, शालिनी सनवे, ग्रामविकास अधिकारी पाटील मॅडम, उपसरपंच सतीशभाऊ करपे, महादेव दिवेकर, आकाश रावस, सुमित करकसे, आप्पासाहेब करपे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी ० ते ५ वर्षे वयोगटातील एकही बालक पोलिओ प्रतिबंधक लसीपासून वंचित राहू नये, असे आवाहन केले. पोलिओमुक्त समाज घडविण्यासाठी प्रत्येक पालकाने आपल्या पाल्याला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून अभियान यशस्वी करावे, असेही त्यांनी सांगितले. गावातील नागरिकांनी या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आरोग्य विभागाच्या उपक्रमाचे स्वागत केले.

---

# टाकळी ढोकेश्वर येथील जलसंधारणाच्या कामाची सुजित झावरे पाटील यांच्याकडून पाहणी

**टाकळीकरांच्या लोकसहभागाचे केले कौतुक**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**टाकळी ढोकेश्वर–** येथे ग्रामस्थ आणि 'आम्ही टाकळीकर' ग्रुपच्या माध्यमातून लोकसहभागातून सुरू असलेल्या जलसंधारणाच्या कामाची जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांनी नुकतीच प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. ग्रामस्थांनी एकत्र येत सुरू केलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे त्यांनी मनापासून कौतुक केले, तसेच टाकळीकरांना या जलसंधारणाच्या कामांमध्ये सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. सध्याच्या काळात पाण्याचे महत्त्व ओळखून टाकळी ढोकेश्वर येथे ग्रामस्थांनी पुढाकार घेतला आहे. लोकसहभागाच्या जोरावर गावात जलसंधारणाची विविध कामे वेगाने सुरू आहेत. या कामाची पाहणी करताना सुजित झावरे पाटील यांनी कामाच्या नियोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. ''अशा प्रकारचा लोकसहभाग इतर गावांसाठीही प्रेरणादायी असून, गावाच्या समृद्धीसाठी पाणी अडवणे आणि जिरवणे अत्यंत गरजेचे आहे,'' असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. तसेच आगामी काळात या कामाला गती देण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली. ''टाकळी ढोकेश्वरच्या ग्रामस्थांनी आणि तरुणांनी एकत्र येत सुरू केलेले जलसंधारणाचे काम कौतुकास्पद आहे. या कामामुळे गावाचा पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होईल. या उपक्रमात मी संपूर्ण ताकदीने टाकळीकरांच्या पाठीशी उभा राहीन.''

**सुजित झावरे पाटील (माजी उपाध्यक्ष, जिल्हा परिषद)**

या पाहणी दौऱ्याप्रसंगी आम्ही टाकळीकर ग्रुपचे सर्व प्रमुख पदाधिकारी, ग्रामस्थ आणि तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुजित झावरे पाटील यांच्या आश्वासनामुळे ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, जलसंधारणाचे काम अधिक गतीने पूर्ण करण्याचा संकल्प ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

---

# पंढरीच्या वारीच्या भक्तिमय सांस्कृतिक कार्यक्रमाने सेंट्रल बँक ऑफ इंडिया ऑफिसर्स असोसिएशन, त्रैवार्षिक अधिवेशन उत्साहात

**पुढील दहा वर्षात बँकिंग क्षेत्रात आमूलाग्र बदल – अच्युत गोडबोले**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पंढरीच्या वारीच्या भक्तिमय सांस्कृतिक कार्यक्रमातून ऐतिहासिक अहिल्यानगरच्या सांस्कृतिक परंपरेची ओळख करून देत सेंट्रल बँक ऑफ इंडिया ऑफिसर्स असोसिएशन, पुणे झोनची त्रैवार्षिक जनरल बॉडी कॉन्फरन्स उत्साहात संपन्न झाली. पुणे, नाशिक, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव तसेच महाराष्ट्रातील सर्व ठिकाणाहून आलेल्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या परिषदेत बदलत्या बँकिंग क्षेत्रातील आव्हाने, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि भविष्यातील तंत्रज्ञानावर मार्गदर्शन व चर्चासत्र झाली.

या परिषदेत प्रमुख वक्ते म्हणून ख्यातनाम लेखक अच्युत गोडबोले यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष मकरंद महाले हे होते. याप्रसंगी बँकेचे पुणे झोनल प्रमुख अजयकुमार सिंग, संघटनेचे जी एस, अरविंद मीना, खजिनदार, स्मिता परब, प्रमोद शिंदे, नरेश कुमार दुबे, विठ्ठल माने, कवींद वालदे, नचिकेत सूर्यवंशी, किशोर मोडक, अल्ताफ मुलानी यांच्यासह पुणे, मुंबई, नागपूर व महाराष्ट्रातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना अच्युत गोडबोले म्हणाले जागतिकीकरणामुळे आर्थिक आणि सामाजिक विषमता वाढली असून हवामान बदलासारखी संकटेही तीव्र झाली आहेत. येत्या दहा वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ऑटोमेशनमुळे बँकिंग क्षेत्रात मोठे बदल होणार असून त्यासाठी कर्मचाऱ्यांनी नवे तंत्रज्ञान आत्मसात करून घ्यावे. एआयचा जमान्यात नोकऱ्यांचे स्वरूप बदलणार आहेत . जो बदल स्वीकारेल त्याची नोकरी टिकेल.कर्मचाऱ्यांना कामावरून काढून नका तर त्यांच्या कामाचे तास कमी करा प्रत्येक माणसाने तीन दिवस काम केले तर आपण आरामात जगू शकतो आपण काबड कष्ट करतो श्रीमंताचे खिसे भरण्यासाठी बदलत्या युगाचे पावले ओळखून प्रत्येकाने काम करावे असे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात मकरंद महाले म्हणाले की, आधुनिक तंत्रज्ञानामुळे कामकाजात बदल होत असले तरी कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी संघटनांची भूमिका भविष्यातही महत्त्वाची राहणार आहे. बँकेच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करणे गरजेचे असून बदलत्या काळाची पावले ओळखून पुढे जाण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे सेवानिवृत्त अधिकारी व सेंट्रल बँक ऑफ इंडिया चे माजी संचालक एस. बी रोडे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच बँकिंग क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. विठ्ठल माने, अल्ताफ मुलानी, अजयकुमार सिंग, नरेश कुमार दुबे, अरविंद मीना, प्रमोद शिंदे व स्मिता परब यांनी मनोगत व्यक्त केले.

# अनामप्रेमच्या चिमुकल्यांसमवेत आयएमएचा डॉक्टर डे साजरा

**डॉक्टर डेनिमित्त आयएमएच्या वतीने अनामा प्रेम संस्थेत मुलांचीआरोग्य तपासणी शिबिर**

**टाकाऊ वस्तू पासून मुलांनी साकारलेल्या कलाकृती पाहून डॉक्टर भारावले**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** डॉक्टर डे निमित्त इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए), अहिल्यानगर शाखेच्या वतीने गांधी मैदान येथील अनामप्रेम संस्थेत सर्वरोग निदान व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. संस्थेतील मुला-मुलींची आरोग्य तपासणी करून त्यांच्यासमवेत डॉक्टर डे उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉक्टरांनी मुलांशी संवाद साधत त्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शनही केले.

कार्यक्रमास आयएमएचे अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी, सचिव डॉ. अमित करडे, माझी अध्यक्ष डॉ. चंद्रवदन मिश्रा, डॉ मिलिंद पोळ, डॉ. नरेंद्र वानखडे, डॉ सचिन पांडुळे , डॉ प्राजक्ता पारधे, डॉ अतुल खालकर, डॉ अविनाश गाडेकर, डॉ महेश घोडके, डॉ रोहित थोरात, डॉ कस्तुरी कुऱ्हाडे, डॉ क्षितिज तांबोळी, डॉ अर्चना सिंग तांबोळी, डॉ अनिलकुमार सिंग, डॉ सत्त्व दराडे, तसेच अनामप्रेम संस्थेचे डॉ मराठे मॅडम, तसेच आयएमए चे व्यवस्थापक श्री विशाल येमुल यांच्यासह आयएमएचे पदाधिकारी, सदस्य आणि शहरातील अनेक डॉक्टर उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''आयएमएच्या वतीने दरवर्षी डॉक्टर डे समाजोपयोगी उपक्रमातून साजरा केला जातो. अनामप्रेमसारख्या संस्थेतील वंचित घटकांना समाजाच्या आधाराची गरज आहे. येथील मुला-मुलींनी टाकाऊ वस्तूंमधून तयार केलेल्या आकर्षक कलाकृती त्यांच्या जिद्दीचे आणि सर्जनशीलतेचे प्रतीक आहेत. या वस्तूंची खरेदी करून त्यांच्या कष्टाला योग्य मोबदला देणे ही समाजाची जबाबदारी आहे. भविष्यात आयएमएच्या विविध कार्यक्रमांमध्ये संस्थेतील उत्पादने खरेदी करून त्यांना प्रोत्साहन दिले जाईल.''ज्येष्ठ तज्ज्ञ डॉ. नरेंद्र वानखेडे म्हणाले गेल्या चार-पाच वर्षांपासून आयएमएच्या वतीने डॉक्टर डे अनामप्रेम संस्थेत साजरा केला जातो. यानिमित्त संस्थेतील सर्व मुलांची मोफत आरोग्य तपासणी करून औषधोपचार केले जातात. सामाजिक बांधिलकी जपत समाजातील तळागाळातील घटकांच्या पाठीशी सदैव उभी राहील असे ते म्हणाले

**जिद्द, कष्ट आणि सर्जनशीलतेचा प्रेरणादायी आदर्श**

अनामप्रेम संस्थेतील मुला-मुली आहेत. टाकाऊ वस्तूंमधून तयार केलेल्या आकर्षक कलाकृती पाहून उपस्थित डॉक्टर भारावून गेले. अत्यंत कठीण परिस्थितीतही चेहऱ्यावर आनंद ठेवत स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारणाऱ्या या मुलांचा आदर्श समाजाने घेतला पाहिजे. त्यांनी बनविलेल्या हस्तकलेच्या वस्तू खरेदी करून त्यांच्या कष्टाचे चीज करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप द्यावी. असे आवाहन आयएमएच्या वतीने करण्यात आले.

# वटसावित्रीच्या पवित्र सणानिमित्त हरित संस्कारांचा जागर; महिला भगिनींना मोफत वडाच्या रोपांचे वितरण

**उपमहापौर एडवोकेट धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतील ना, पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय संस्कृतीतील वृक्षपूजनाची परंपरा आणि पर्यावरण संवर्धनाची आधुनिक गरज यांचा सुंदर संगम घडवत साई द्वारका सेवा ट्रस्ट व अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने, अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर एडवोकेट धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या पालकमंत्री ग्रीन सिटी अभियानांतर्गत वटसावित्री पौर्णिमेच्या सणानिमित्त महिला माता-भगिनींना मोफत वडाच्या रोपांचे वितरण करण्यात आले. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणाऱ्या या अभिनव उपक्रमाला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शहराला हरित बनविण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते वडाच्या रोपांचे वितरण करण्यात आले. यावेळी मा नगरसेविका सुप्रिया धनंजय जाधव, अर्चना परकाळे, पुनम मुथा, दीपाली काकडे, जया शेलार, अर्चना काकडे, सुनीता कवळे, सीमा काकडे, दीपाली तुंगार, आशा पांडुळे, रितू लेले यांच्यासह मोठ्या संख्येने महिला माता-भगिनी उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना उपमहापौर एडवोकेटधनंजय जाधव यांनी ग्रीन सिटी ही केवळ एक योजना नसून प्रत्येक नागरिकाचा सहभाग असलेली सामाजिक लोकचळवळ असल्याचे सांगितले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक कुटुंबाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. आज लावलेले प्रत्येक रोप उद्याच्या पिढ्यांना शुद्ध हवा, स्वच्छ पर्यावरण आणि समृद्ध जीवन देईल, असा



विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मा,नगरसेविका सुप्रिया धनंजय जाधव यांनी वटसावित्री पौर्णिमेचे धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय महत्त्व अधोरेखित केले. भारतीय संस्कृतीत वडाच्या वृक्षाला दीर्घायुष्य, समृद्धी आणि जीवनदायी शक्तीचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे परंपरेचे जतन करताना पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारली पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

पुनम मुथा म्हणाल्या की नामदार पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेमध्ये . महिलांच्या सक्रिय सहभागातून हरित क्रांतीची नवी चळवळ उभारली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी कैलास दिघे, हर्षल आगळे, अशोक कुटे, ॲड. दिनानाथ जाधव, राहुल मुथा,सोनू बोरुडे यांच्यासह अनेक निसर्गप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रभावी आणि ओघवते सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले, तर उपस्थितांचे आभार हर्षल आगळे यांनी मानले.नगरी व्हिलेज येथील ट्री बँकेमध्ये उद्या दिवसभर महिला माता भगिनींसाठी ही वडाची रोपे मोफत उपलब्ध केली

वटसावित्रीच्या निमित्ताने श्रद्धा, संस्कृती आणि पर्यावरण संवर्धनाचा त्रिवेणी संगम घडविणाऱ्या या उपक्रमाने एक रोप... एक जबाबदारी... एक हरित भविष्य हा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचवला. शहराला हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनविण्यासाठी लोकसहभागातून उभारली जात असलेली ग्रीन सिटी चळवळ भविष्यात अधिक व्यापक होणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

**स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या स्मरणार्थ शिराढोण येथे दरेकर मित्रपरिवाराच्यावतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप**

# शालेय साहित्य हे केवळ वह्या-पुस्तके नसून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी - आमदार अक्षय कर्डिले



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या स्मरणार्थ शिराढोण येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघाचे आमदार म्हणून निवड झाल्याबद्दल आमदार अक्षय कर्डिले यांचा शिराढोण ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. गावातील नागरिक, विद्यार्थी, पालक आणि कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन, पॅड, दप्तर तसेच विविध शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला ग्रामस्थांनी मोठा प्रतिसाद दिला. स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी आयुष्यभर शिक्षण, विकास आणि जनसेवेचा ध्यास घेतला होता. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे त्यांच्या कार्याला उजाळा मिळाला.

आमदार अक्षय कर्डिले यांनी शिराढोण गावाशी आणि नगर तालुक्याशी असलेल्या कर्डिले कुटुंबाच्या जिव्हाळ्याच्या नात्याला उजाळा दिला. ते म्हणाले, हा माझा अधिकृत मतदारसंघ नसला तरी नगर तालुक्यातील नागरिकांचे माझ्यावर आणि स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले साहेबांवर विशेष प्रेम आहे. कर्डिले साहेबांना पहिल्यांदा विधानसभेत पाठविण्यासाठी या भागातील जनतेने मोठे परिश्रम घेतले. त्यामुळे नगर तालुका आणि कर्डिले कुटुंबाचे एक वेगळे ऋणानुबंध निर्माण झाले आहेत आणि शिराढोण गाव हे त्या नात्याचे महत्त्वाचे प्रतीक आहे.मी या भागाचा आमदार नसलो तरी तुम्ही सर्वजण माझे कुटुंब आहात. शिराढोण गावाच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी मी कायम उपलब्ध राहणार आहे. गावाच्या विकासामध्ये कोणतीही कमतरता पडू देणार नाही. रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य आणि मूलभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, आज दिले जाणारे शालेय साहित्य हे केवळ वह्या-पुस्तके नसून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी आहे. शिक्षण हेच जीवनातील सर्वात मोठे शस्त्र असून त्याच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते. मोबाईल आणि इतर आकर्षणांपासून दूर राहून अभ्यास, शिस्त आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन करा. भविष्यात या गावातील विद्यार्थी डॉक्टर, अभियंते, अधिकारी, उद्योजक आणि लोकप्रतिनिधी म्हणून नाव कमावतील, असा मला विश्वास आहे. विद्यार्थ्यांचे यश हीच स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले साहेबांना खरी आदरांजली ठरेल.

शिराढोण ग्रामस्थांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमामध्ये दादा दरेकर मित्रपरिवार आणि सोनू दरेकर मित्रपरिवार यांचा विशेष सहभाग आणि मोठा सिंहाचा वाटा होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दोन्ही मित्रपरिवारांनी विशेष परिश्रम घेतले. विशेष म्हणजे, दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांना पहिल्यांदा विधानसभेत पाठविण्यासाठी नगर तालुक्यातील शिराढोण गावाचा मोठा सिंहाचा वाटा होता. त्याचप्रमाणे आमदार अक्षय कर्डिले यांच्या विजयामध्ये देखील शिराढोण ग्रामस्थांसह दादा दरेकर आणि सोनू दरेकर मित्रपरिवाराने महत्त्वाची भूमिका बजावली असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.या कार्यक्रमास शिराढोण ग्रामस्थ, नगर तालुक्यातील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी ग्रामस्थांनी आमदार अक्षय कर्डिले यांना पुढील राजकीय आणि सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. शालेय साहित्य वाटपाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा हा एक प्रेरणादायी उपक्रम ठरला.

# अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेला उत्साहात प्रारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेला रविवारी शहरभर उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. शहरातील महापालिकेच्या सात आरोग्य केंद्रांवर तसेच २२५ पोलिओ बूथ केंद्रांवर शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ लसीकरणाचा डोस देण्यासाठी पालकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली. महापालिका आरोग्य विभागाने केलेल्या नियोजनबद्ध तयारीमुळे लसीकरण प्रक्रिया सुरळीत पार पडत असल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले.

कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे महापौर ज्योतीताई गाडे व महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती वर्षा सानप यांच्या हस्ते बालकाला पल्स पोलिओचा डोस देऊन मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, नगरसेविका मंगल लोखंडे, डॉ. सुधा कांकरिया, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. धनंजय कुलकर्णी, रोटरी क्लबचे अध्यक्ष सुनील कटारिया, डॉ. दिलीप बागल, योगेश औटी, डॉ. शिल्पा पाठक, डॉ. वृषाली पाटील, डॉ. भाग्यश्री अंभिरे, डॉ. जोशी, डॉ. वृषाली आरु, संगीता दळवी, कविता खिलारी आदींसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, ''पल्स पोलिओचे दोन थेंब हे प्रत्येक बालकाच्या निरोगी, सुदृढ आणि सुरक्षित भविष्यासाठी अत्यंत लाभदायक आहेत. महापालिका आरोग्य विभागाने शहरातील प्रत्येक पात्र बालकापर्यंत लसीकरण पोहोचविण्यासाठी व्यापक आणि नियोजनबद्ध तयारी केली असून यंदाचे लसीकरणाचे उद्दिष्ट निश्चितपणे पूर्ण केले जाईल. आज ज्या बालकांना काही कारणास्तव लसीकरणाचा डोस मिळू शकला नाही, त्या प्रत्येक बालकाच्या घरी पुढील पाच दिवस आरोग्य विभागाची विशेष पथके जाऊन पल्स पोलिओचा डोस देणार आहेत. एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही, यासाठी महापालिका कटिबद्ध आहे,'' असे त्यांनी सांगितले.

यावेळी मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांनी राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेची सविस्तर माहिती देत शहरातील लसीकरण नियोजन, बूथ व्यवस्था आणि पुढील पाच दिवसांच्या घरभेट मोहिमेबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. वृषाली आरु यांनी उपस्थित मान्यवर, आरोग्य कर्मचारी, स्वयंसेवक आणि पालकांचे आभार मानले.

अहिल्यानगर महानगरपालिका तोफखाना आरोग्य केंद्रात राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेचा शुभारंभ नगरसेविका शीतल अजय ढोणे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. श्रद्धा ढोणे, भारत ढोणे, डॉ. कांचन रचा, डॉ. शुभम गाडे, सचिन गरकर, रोहिणी सानप आदी उपस्थित होते. उपस्थितांनी पालकांना आपल्या बालकांना नियमित लसीकरणासोबतच पल्स पोलिओचे दोन थेंब देण्याचे आवाहन करत पोलिओमुक्त भारताच्या संकल्पाला बळकटी देण्याचे आवाहन केले.

(पान १ वरून)

## दिल्लीगेट येथील रस्ता दुभाजकामुळे एकाच वेळी चार अपघात

सुनील सुडके, संदीप गवळी, नितीन पावले, रोहन सांगोळे, मयूर फुले, धीरज रोहकले, पत्रकार राजेंद्र येंडे, यांच्यासह दिल्लीगेट परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच रस्ता दुभाजकामुळे गेल्या तीन ते चार महिन्यात अनेक वाहनांचे अपघात घडलेले आहेत या अपघातामध्ये जीवितहानी झाली नसली तरी अपघातग्रस्त वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. असे व्यापारी आणि नागरिकांनी उपमहापौर धनंजय जाधव यांना सांगितले.

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने रात्रीच्या सुमारास पाऊस आल्यानंतर, वाहनचालकांना अंधारात रस्ता दुभाजक दिसून येत नसल्याने आज पर्यंतचे अपघात घडलेले आहेत. या अपघात ग्रस्त भागाची पाहणी महानगरपालिकेचे अभियंता निंबाळकर यांनी स्वतः केली, तसेच याबाबत उपाययोजना करण्यासाठी महानगरपालिकेचे कर्मचारी घटनास्थळी हजर होते. निंबाळकर यांनी या दुभाजकासाठी तात्काळ उपाययोजना करावी असे आदेश कर्मचाऱ्यांना दिले आहे.

## संदेशनगरला साई मंदिरात वटपौर्णिमा उत्साहात साजरी

कार्यक्रम होत असतो. गुरुपौर्णिमेच्या उत्सवाला साई मंदिरात शिर्डीप्रमाणेच भाविक दर्शनासाठी गर्दी करतात. या मंदिर परिसरात विविध प्रकारचे वृक्षारोपण करण्यात आले आहे माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके यांच्या पुढाकारातून येथे विविध धार्मिक कार्यक्रम होत असतात आज वटपौर्णिमेनिमित्त परिसरातील महिलांनी वडाची पूजा करून सात फेऱ्या मारून आपल्या पती राजांसाठी आयुष्य वाढून सात जन्म हाच पती मिळावा अशी प्रार्थना केली. यावेळी सुवासिनी महिलांना नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके यांनी हळदी कुंकवाचा मान दिला. उपस्थित महिलांनी समाधान व्यक्त केले.

## विसापूरात गांजा विक्रीवर बेलवंडी पोलिसांचा छापा

त्यानंतर त्याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.

या प्रकरणात अमली पदार्थ विक्रीच्या उद्देशाने गांजा बाळगल्याप्रकरणी संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, या प्रकरणातील मुख्य आरोपी अमीन शफी शेख हा कारवाईदरम्यान घटनास्थळावरून पसार झाला असून त्याचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि कर्जत विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईमध्ये नंदकुमार सोनवलकर यांच्यासह पोलीस हवालदार भाऊसाहेब यमगर, धर्मराज दहिफळे, भाऊसाहेब शिंदे तसेच पोलीस शिपाई दादा क्षीरसागर, विनोद पवार आणि विठ्ठल खरमाळे यांनी सहभाग घेतला. पोलिसांनी अमली पदार्थांविरोधातील कारवाया अधिक तीव्र करण्यात आल्या असून अशा बेकायदेशीर व्यवसायांवर कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

## आजचे बालक हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य - आमदार संग्राम जगताप

नोंदविला. शहरभर विविध बूथ केंद्रांवर लसीकरणाची मोहीम उत्साहात सुरू असून आरोग्य विभागामार्फत प्रत्येक पात्र बालकापर्यंत पोलिओचे दोन थेंब पोहोचविण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. यावेळी माजी स्थायी समिती सभापती अविनाश घुले नगरसेवक सुरेश बनसोडे माजी नगरसेवक विपुल शेटीया गोरख पडोळे आदीसह पालक उपस्थित होते

## नगर शहरातील कत्तलखान्यावर एलसीबीचा छापा; तिघे गजाआड

रा. सुभेदार गल्ली, झेंडीगेट, अहिल्यानगर) अशा तिघांना अटक करण्यात आली. त्यांनी फरार आरोपी आयुनल फयाज अहमद कुरेशी याच्या सांगण्यावरून हे काम करत असल्याची कबुली दिली.

पोलिसांनी घटनास्थळावरून ४६ हजार रुपये किमतीचे २३० किलो गोमांस, २५ हजार रुपयांची खिमा बनवण्याची स्टील मशीन, ५ हजार रुपयांचा इलेक्ट्रॉनिक वजन काटा आणि कत्तलीसाठी वापरले जाणारे साहित्य असा एकूण ७६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी आरोपींविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१, ३२५, ३(५) आणि प्राणी संरक्षण अधिनियमातील कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास तोफखाना पोलीस करत आहेत. सदरची यशस्वी कारवाई उपनिरीक्षक दीपक मेढे, अरविंद भिंगारदिवे, सुनील पवार, शाहीद शेख, गणेश धोत्रे व योगेश भिंगारदिवे यांच्या पथकाने केली.

## पढेगाव खून प्रकरणातील आरोपी एमआयडीसी पोलिसांकडून जेरबंद

गुन्हा घडल्यापासून आरोपी फरार होता. दरम्यान, तो एमआयडी.सी. परिसरातील साईबन येथे आल्याची गोपनीय माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांना मिळाली. त्यांनी तातडीने तपास पथकाला सूचना देऊन आरोपीला साईबन परिसरातून ताब्यात घेतले. पुढील तपासासाठी आरोपीला श्रीरामपूर तालुका पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. सदरची कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि हेमंत थोरात, राकेश खेडकर, शैलेश रोहोकले, राजू सुद्रीक, दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, राहुल गुंडू आणि अरुण सांगळे यांच्या पथकाने केली.